पनवेल(प्रतिनिधी) यशाची शिखरे पादाक्रांत करण्यासाठी जिद्द, मेहनत व आत्मविश्वासाने कार्यरत राहाणे गरजेचे असून या त्रीसूत्राच्या आधारे प्रत्येक विद्यार्थ्याने आपले जीवनमान उंचवावे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खांदा कॉलनी येथे सोमवारी (दि.१७) केले.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिनानिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता 'शिक्षित भारत, सक्षम भारत' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, चांगल्या विचारांची अंमलबजावणी करिअरसाठी दिशादर्शक ठरत असते. मोठे स्वप्न पहा आणि ते सत्यात उतरविण्यासाठी जिद्द व मेहनतीने कार्यरत रहा, असा मोलाचा सल्लाही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावे व त्यांचे सक्षमिकरण झाले पाहिजे यासाठी महाविद्यालय सतत प्रयत्नशिल राहिले आहे.महाविद्यालयाने अवघ्या सोळा वर्षाच्या काळात दोनवेळा नॅकचा 'अ' दर्जा मिळविण्याबरोबरच मुंबई विद्यापीठात सर्वोत्कृष्ठ महाविद्यालयाचा मान पटकाविला आहे. उद्याच्या स्पर्धा जिंकण्याचे काम आजच्या विद्यार्थ्यांनी केले पाहिजे या हेतूने येथे ज्ञानदानाचे काम होत असून प्राचार्य एस.टी.गडदे यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी, शिक्षकवर्ग महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल करीत असून त्यामध्ये पालकांचीही साथ मिळत आहे, असेही ते म्हणाले. यावेळी त्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या परिसरातील स्वच्छता मोहिमेत सहभाग घेवून स्वच्छ भारत अभियानात योगदान द्यावे, असे आवाहन केले तसेच महाविद्यालयाच्यावतीने करण्यात आलेल्या सत्काराबद्दल शिक्षक व विद्यार्थ्यांचे आपल्या भाषणातून आभार व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाच्यावतीने संस्थेचे अध्यक्ष अरूणशेठ भगत यांच्या हस्ते नवनिर्वाचित आमदार प्रशांत ठाकूर यांचा हृदय सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.टी.गडदे यांनी तर सुत्रसंचालन प्रा. राजेश येवले यांनी केले. या कार्यक्रमास डॉ.एस.के.पाटील, डॉ.एलिझाबेथ मॅथ्यू, डॉ.उध्दव भंडारे, डॉ.नारखडे, डॉ.बाळासाहेब आघाव, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठया उपस्थित होते